(२१४)

राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या
संचालक मंडळाच्या अभ्यास दौऱ्याबाबत

महाराष्ट्र शासन
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार,मुंबई- ४०० ०३२
शासन निर्णय क्र.कृबास- ०५११/प्र.क्र.१६५/११-स, दिनांक :- १२ सप्टेंबर, २०११

वाचा :- शासन पत्र क्र.कृबास १०-२००१/प्र.क्र.१३/११-स, दि.३.२.२००१

**शासन निर्णय :-**

कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या कामकाजात आधुनिकता व गतिमानता आणण्याच्या दृष्टीने राज्यातील विविध बाजार समित्या या राज्यातील, इतर राज्यातील तसेच विदेशातील बाजार समित्यांनी केलेले नवनवीन प्रयोग तथा उपक्रम पहाण्याकरिता देशांतर्गत तसेच परदेशी दौरे आयोजित करुन त्यास मान्यता देण्याविषयीचे प्रस्ताव शासनास सादर करीत असतात व अनेकवेळा कार्योत्तर मंजूरीस्तव प्रस्तावदेखील शासनास सादर केले जातात. उपरोक्त दि.३.२.२००१ च्या शासन पत्रान्वये राज्यांतर्गत अभ्यास दौऱ्यांसाठी प्रतिसदस्य रु.४०००/- व देशांतर्गत अभ्यास दौऱ्यासाठी प्रतिसदस्य रु.६,०००/- खर्च अनुज्ञेय होता. परंतु गेल्या दहा वर्षातील वाढलेला महागाई निर्देशांक, प्रवासखर्च व बाहेरगावी राहण्याचा हॉटेलखर्च इत्यादी गोष्टींमधील वाढ लक्षात घेता बाजार समितीकडून केले जाणारे अभ्यासदौरे आयोजित करण्याविषयी पुढीलप्रमाणे निर्देशित करण्यात येत आहे :-

१) राज्यांतगत दौऱ्याकरिता प्रतिसदस्य रु.६,०००/- अनुज्ञेय राहील.

२) राज्याबाहेरील परंतु देशांतर्गत दौऱ्याकरिता प्रतिसदस्य रु.२०,०००/- अनुज्ञेय राहील.

३) विदेश दौऱ्याकरिता प्रतिसदस्य रु.५०,०००/- पर्यंत अनुज्ञेय राहील.

४) अभ्यास दौऱ्याच्या रकमेची प्रत्येक बाजार समितीने तरतूद त्यांच्या चालू वर्षीच्या अर्थसंकल्पात करणे आवश्यक राहील व त्यास पणन मंडळाची मंजूरी असावी.

५) चालू अर्थिक वर्षातील अभ्यास दौऱ्याचा खर्च त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे अपेक्षित आहे. पुढील आर्थिक वर्षात कोणत्याही परिस्थितीत मागील आर्थिक वर्षातील अभ्यासदौरा खर्च मान्य केला जाणार नाही.

६) अभ्यास दौरा करणाऱ्या बाजार समितीचे मागील तीन वर्षाचे लेखा परीक्षण पूर्ण झालेले असणे आवश्यक आहे. तसेच सदर बाजार समितीचा मागील वर्षाचा ताळेबंद हा वाढाव्याचा असणे आवश्यक आहे.

७) बाजार समितीकडे कृषि पणन मंडळाचे कर्ज व कर्जावरील व्याज, अंशदान, शासन कर थकबाकी नसावी.

८) बाजार समितीने विकासात्मक कामासाठी वित्तीय संस्था/ बँकेकडून काही निधी प्राप्त करुन घेतला असल्यास अशा संस्थेचा कर्जाचा हप्ता थकीत राहीला असल्यास अभ्यास दौरा करता येणार नाही.

९) अभ्यास दौ-याचा एकूण खर्च हा मागील वर्षाच्या वाढाव्याच्या ५% किंवा रुपये दोन लाख यापैकी जे कमी तेवढया मर्यादेपर्यंत राहील.

१०) राज्यांतर्गत दौरा दोन वर्षातून एकदा, देशांतर्गत दौरा अडीच वर्षातून एकदा व विदेश दौरा पाच वर्षात एकदा करण्यास अनुमती राहील. एका आर्थिक वर्षात यापैकी एकच अभ्यासदौरा अनुज्ञेय राहील.

११) उपरोक्त अभ्यास दौऱ्यांना शासन पूर्वमान्यता घेणे बंधनकारक राहील. शासन पूर्वमान्यतेशिवाय अभ्यास दौरा केल्यास सदर दौऱ्याचा खर्च संचालकांकडून वैयक्तिकरित्या वसुलीस पात्र राहील.

२. परिच्छेद क्र.१ मधील निदेशानुसार सर्व सक्षम प्राधिकाऱ्याने तंतोतंत पालन करुन कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( अजिंक्य व. बगाडे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन,
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रति :-

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) कृषि पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, गुलटेकडी, पुणे ३७
४) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
५) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
६) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
७) महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादीत, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे
८) सभापती/सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व) मार्फत संबंधित जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था
९) महालेखापाल-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
१०) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
११) निवासी लेखाधिकारी, मुंबई.
१२) सर्व जिल्हा कोषागार, अधिकारी.
१३) निवड नस्ती ( ११- स)

पणन संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे-१
शाखा :- 5
आवक क्रमांक :- 1811
दिनांक :- 17/9/11